**कृषि उन्नती योजना राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत बियाणे घटकाच्या (१०० टक्के केंद्र हिस्सा) सन २०२६-२७ च्या वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता देणे.**

# महाराष्ट्र शासन

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:- कृवपदुम- १२०२७/४४/२०२६-MAG-1A (E :-१६४२२४०)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२

दिनांक :- ११ मे, २०२६

<u>वाचा:-</u>

१. केंद्र शासनाचे पत्र क्र. २-३३/२०२४--NFSNM, दिनांक १६.०४.२०२५
२. ४२ व्या SLSC मिटिंग चे इतिवृत्त No. CSS-२०२६/C.R.१९/२-A, दि.११.०३.२०२६.
३. केंद्र शासनाचे पत्र F.O. No. ०३-/१४/२०२६-KY (FTS:१८६५५७), दि.२२.०४.२०२६
४. कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.गुनि१/२/केवाय/बियाणे/२६-२७/र-२६०/२०२६ दि. ३०.०४.२०२६

<u>प्रस्तावना :-</u>

शेतकऱ्यांना उच्चतम प्रतीचे बियाणे वेळेवर आणि माफक दरात उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने बाराव्या पंचवार्षिक योजनेदरम्यान राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान मिशन अंतर्गत बियाणे व लागवड साहित्य उपअभियानाची अंमलबजावणी सन २०१४-१५ पासून सुरु झाली.

२. केंद्र शासनाच्या वित्तीय व्यय समितीच्या शिफारसीनुसार, बियाणे व लागवड साहित्य उपअभियानामधील सर्व उपघटक "कृषी उन्नती योजने" अंतर्गत "राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान" मध्ये विलीन केले असून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानाचे नाव बदलून "राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान" असे केले आहे.

३. वाचा क्र.१ अन्वये केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानाच्या नवीन मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार बियाणे व लागवड साहित्य उपअभियानाचा समावेश राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानात “बियाणे घटक” म्हणून केला आहे.

४. वाचा क्र. २ अन्वये ४२ व्या राज्यस्तरीय मंजुरी समितीच्या दि. १०.०३.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानातील बियाणे घटकासाठी सन २०२६-२७ साठी रु. २३११.३२ लाख इतक्या रक्कमेच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता दिली आहे.

५. केंद्र शासनाने वाचा क्र.३ येथील पत्रान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान - बियाणे घटकासाठी सन २०२५-२६ च्या प्रलंबित दायित्व (रु.२१२.३१ लाख) रक्कमेसहीत एकूण

रु. २४९४.९४ लाख रकमेच्या वार्षिक कृषी आराखड्यास मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार कृषि उन्नती योजनेंतर्गत बियाणे घटकाखालील उपघटकांचा रुपये २४९४.९४ लाख रक्कमेच्या वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

कृषि उन्नती योजनेअंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत बियाणे घटकाखालील उपघटक (१०० टक्के केंद्र हिस्सा) सन २०२६-२७ मध्ये राबविण्याच्या रुपये २४९४.९४ लाख रकमेच्या वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबतचा उपघटक निहाय व उपघटकांतर्गत बाबनिहाय सविस्तर तपशील अनुक्रमे **परिशिष्ट अ** व **परिशिष्ट ब** मध्ये दिला आहे.

२. राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत बियाणे घटक (१०० टक्के) याअंतर्गत येणाऱ्या विविध उपघटकांसाठीची अर्थसंकल्पीय तरतूद २०२६-२७ साठीची खालील लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकण्यात यावी.

| अ.क्र. | योजना (१०० टक्के केंद्र हिस्सा) | लेखाशीर्ष |
|---|---|---|
| १ | कृषि उन्नती योजना बियाणे तपासणी प्रयोगशाळांचे बळकटीकरण | २४०१ बी४९१ |
| २ | कृषि उन्नती योजना नॅशनल सीड रिझर्व्ह | २४०१ बी६५१ |
| ३ | कृषि उन्नती योजना बियाणे गुणवत्ता नियंत्रण घटकांचे बळकटीकरण | २४०१ बी६६२ |

३. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तींचे पालन करण्यात यावे.

१) केंद्र शासनाच्या संदर्भाधीन मार्गदर्शक सूचना, तसेच केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवळी दिल्या जाणाऱ्या सूचना, केंद्र व राज्य शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्ती इ.नुसार सदर योजनेची अंमलबजावणी करावी.

२) या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टामध्ये सदर योजनेंतर्गत मंजूर घटकनिहाय तपशील आहे.

३) सदर योजना राबविताना संबंधित शेतकरी लाभार्थी यांचे ॲग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणी केलेले फार्मर आयडी, शेतजमीनीचे जिओ टॅगिंग झाले आहे, याची खात्री करावी व कृषि मॅपर प्रणालीचा अवलंब करावा.

४) खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवून सदर खर्चाचे लेखा परिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र व राज्य शासनाला लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करावेत.

५) योजनेच्या वेगवेगळया बाबींवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र व शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावा.

६) योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमाखर्चाची रक्कम याचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरुवातीला अखर्चित रक्कम व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमूद करावे. जेणेकरून पारदर्शी स्वरुपात रक्कम विचारात घेता येईल व संदिग्धता राहणार नाही.

७) कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

८) सदर योजनेकरीता मंजूर झालेला निधी हा ज्या संवर्गासाठी मंजूर केलेला आहे, त्याच संवर्गासाठी खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

४. सदर योजनेकरीता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून व त्यांच्या कार्यालयातील सहायक संचालक, लेखा-१ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर निधी खर्च करतांना विहित कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे / टेंडर नियामावली व नियमांचे/ प्रक्रियेचे/ वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/ P.W.D. म्यॅनुअलच्या अधिन राहून/ C.V.C.तत्वानूसार/ CAG च्या निर्देशानुसार/ प्रचलित शासन निर्णय/ नियम/ परिपत्रक/ तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन निर्णय/ अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहिल.

६. सदर शासन निर्णय प्रकल्प मंजुरी समितीच्या संदर्भ क्र. ३ येथील मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०५१११२५९१३९४०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHUSUDAN SAKPAL

Digitally signed by SUHAS MADHUSUDAN SAKPAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=01592dd98f36fbc924826517361a31b8166fce7745d35b95fa79159b8fb74478, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=82434617B1F4C6035B3CC29788B8D394A52FB3EDABFC26B4E85EBC2AF7C45FF9, cn=SUHAS MADHUSUDAN SAKPAL
Date: 2026.05.11 16:41:58 +05'30'

**( सुहास सकपाळ )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/परिषद), महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
४. मा. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, महाबीज भवन, कृषिनगर, अकोला.
७. संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा) परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
१०.सर्व विभागीय कृषि सहसंचालक
११.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२.सहाय्यक संचालक, लेखा १, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३.अवर सचिव (का-१४३१),नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.अवरसचिव वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
१५.निवड नस्ती (१-अे)

शासन निर्णय क्रमांक कृवपदुम- १२०२७/४४/२०२६-MAG-1A (E :- १६४२२४०)
दिनांक :- ११ मे, २०२६

# परिशिष्ट अ

## वार्षिक कृती आराखडा सन २०२६-२७

## कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत बियाणे घटक अंतर्गत उपघटकनिहाय सविस्तर तपशील

| अ.क्र. | उपघटकाचे नाव | रक्कम (रु. लाख) | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | Assistance for Fostering Seeds of New Varieties | | |
| १.१ | Assistance on Foundation Seeds | ७९.९६ | राष्ट्रीय बीज निगम |
| १.२ | Assistance on Certification Charges | १४.५३ | राष्ट्रीय बीज निगम |
| | एकूण (१) | ९४.४९ | |
| २ | Creation & Modernization of Seed Infrastructure | | |
| २.१ | Assistance for Seed Processing Plant and related Infrastructure | | |
| २.१.१ | Assistance for Seed Processing Plant & Supporting Machinery | २२५.०० | म.फु.कृ.वि. राहुरी व डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला |
| २.१.२ | Assistance for Plant Building, Receiving Shed & Drying Platform | ४८१.०० | म.फु.कृ.वि. राहुरी व डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला |
| २.२ | Assistance for Seed Storage Godowns | | |
| २.२.१ | Sheet Type Roof (with AC/GI sheets) | ५८८.०० | म.फु.कृ.वि. राहुरी व डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला |
| २.२.२ | Ventilated Flat Roof | ४९०.०० | म.फु.कृ.वि. राहुरी व डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला |
| | एकूण (२) | १७८४.०० | |

| अ.क्र. | उपघटकाचे नाव | रक्कम (रु. लाख) | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|
| ३ | Strengthening of Seed Quality Control Components | | |
| ३.१ | Creation/Strengthening of Seed Quality Control | | |
| ३.१.१ | Purchase of Equipment for seed testing Laboratories | ९६.७९ | कृषी आयुक्तालय, पुणे |
| ३.१.२ | Renovation of existing Seed testing Laboratories | २५.०० | कृषी आयुक्तालय, पुणे |
| ३.२ | Development /Strengthening of conventional Genetic Purity Testing | | |
| ३.२.१ | Strengthening Grow Out Test Farm | १००.०० | डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला |
| ३.३ | Capacity Building 10 एक दिवसीय प्रशिक्षणासाठी (प्रत्येकी 100 प्रशिक्षणार्थी) | १०.०० | कृषी आयुक्तालय, पुणे |
| ३.४ | Assistance for strengthening of Seed Law Enforcement | ५.०० | कृषी आयुक्तालय, पुणे |
| ३.५ | Development & Strengthening of Digital Facilities | १७.०० | डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला |
| **एकूण (३)** | | **२५३.७९** | |
| ४ | National Seed Reserve | | |
| ४.१. | Maintenance Cost | ९६.२४ | महाबीज, अकोला |
| | **एकूण (४)** | **९६.२४** | |
| ५ | प्रशासकीय, संनियंत्रण व मूल्यमापन खर्च (एकूण खर्चाच्या २.५ टक्के) | **५४.११** | |
| **अ** | **एकूण (१+२+३+४+५)** | **२२८२.६३** | |
| **ब** | प्रलंबित दायित्व (सन २०२५-२६) (Strengthening of Seed Quality Control) | **२१२.३१** | |
| **एकंदर (अ+ब)** | | **२४९४.९४** | |

-------------

## परिशिष्ट ब

## परिशिष्ट अ मध्ये नमूद उपघटकांतर्गत बाबनिहाय तपशील

**१. Assistance for fostering seeds of new varieties** (१०० % केंद्र हिस्सा):-

अर्थसहाय्याचे घटक व अंमलबजावणीची कार्यपद्धती:

१.१ **Assistance on Foundation Seeds** (१००% केंद्र हिस्सा):-

१.१.अ) पायाभूत बियाणांवर अर्थसहाय्य - प्रस्तावित कार्यक्रम (सन २०२६-२७)-

| अ. क्र. | हंगाम | पिकाचे नाव | क्षेत्र (हे.) | पायाभूत बियाणे वितरण लक्ष्यांक (क्विं.) | आर्थिक तरतूद (रु.लाख) |
|---|---|---|---|---|---|
| १ | खरीप | तूर | १०००.०० | १००.०० | ५.५० |
| | | उडीद | १८७.५० | १५.०० | ०.८३ |
| | | मुग | ६२५.०० | ५०.०० | २.७५ |
| | **एकूण खरीप** | | **१८१२.५०** | **१६५.००** | **९.०८** |
| २ | रब्बी | हरभरा | १६१७.०० | १२१२.७३ | ६६.७० |
| | | गहू | १७५.०० | १७५.०० | ३.८५ |
| | | ज्वारी | १२५.०० | १०.०० | ०.३३ |
| | **एकूण रब्बी** | | **१९१७.००** | **१३९७.७३** | **७०.८८** |
| **एकूण (खरीप+ रब्बी)** | | | **३७२९.५०** | **१५६२.७३** | **७९.९६** |

१.२ **Assistance on Certification Charges** (१००% केंद्र हिस्सा):-

१.२.अ) सन २०२६-२७ प्रस्तावित कार्यक्रम-

| अ. क्र. | हंगाम | पिकाचे नाव | क्षेत्र (हे.) | पायाभूत बियाणे वितरण लक्ष्यांक (क्विं.) | आर्थिक तरतूद (रु.लाख) रु.४००/- प्रति हे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | खरीप | तूर | १०००.०० | १००.०० | ४.०० |
| | | उडीद | १८७.५० | १५.०० | ०.७५ |
| | | मुग | ६२५.०० | ५०.०० | २.५० |
| | **एकूण खरीप** | | **१८१२.५०** | **१६५.००** | **७.२५** |
| २ | रब्बी | हरभरा | १५२०.०० | ११४०.०० | ६.०८ |
| | | गहू | १७५.०० | १७५.०० | ०.७० |
| | | ज्वारी | १२५.०० | १०.०० | ०.५० |
| | **एकूण रब्बी** | | **१८२०.००** | **१३२५.००** | **७.२८** |
| **एकूण (खरीप+ रब्बी)** | | | **३६३२.५०** | **१४९०.००** | **१४.५३** |

**२. Creation & Modernization of Seed Infrastructure:– (१००% केंद्र हिस्सा)**

**२.१ Assistance for Seed Processing Plant (SPP) and related Infrastructure :-**

**२.१.अ. Assistance for Seed Processing Plant (SPP) & Supporting Machinery**

| अ. क्र. | किमान वार्षिक क्षमता (मे.टन) | किमान वार्षिक क्षमता (टी.पी.एच.) | SPP यंत्रसामुग्री/ उपकरणांचा खर्च | सहाय्यक यंत्रसामग्री/ उपकरणांचा खर्च | SPP संख्या | एकूण खर्च (रु. लाख) | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५००० | १० | ९९ | ५१ | १ | १५० | म.फु.कृ.वि.राहुरी |
| २ | १००० | २ | ५० | २५ | १ | ७५ | डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला |
| **एकूण** | | | | | **२** | **२२५** | |

**२.१.ब.(Assistance for Plant Building, Receiving Shed & Drying Platform)**

| अ. क्र. | प्रकल्पाची वार्षिक क्षमता (मे.टन) | इमारत व रिसिव्हिंग शेड (Plant Building & Receiving Shed) | | | | ड्रायिंग प्लॅटफॉर्म (Drying Platform) | | | | एकूण खर्च (रु. लाख) | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आकार (चौ.मी.) | दर (प्रति चौ.मी.) | PB व RS संख्या | एकूण खर्च (रु.लाख) | आकार (चौ.मी.) | दर (प्रति चौ.मी.) | DP संख्या | एकूण खर्च (रु.लाख) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११=(६+१०) | १२ |
| १ | ५००० | १००० | २८००० | १ | २८० | ५०० | ६००० | १ | ३० | ३१० | म.फु.कृ.वि. राहुरी |
| २ | २००० | ५२५ | २८००० | १ | १४७ | २०० | ६००० | २ | २४ | १७१ | डॉ.पं.दे.कृ. वि. अकोला |
| **एकूण** | | | | **२** | **४२७** | | | **३** | **५४** | **४८१** | |

**२.२ Seed Storage Godowns –**

| अ. क्र. | गोडाऊन प्रकार | क्षमता (मे.टन) | किमान आकार (चौ.मी.) | दर (प्रति चौ.मी.) | साठवणूक गोडाऊन संख्या | एकूण खर्च (रु. लाख) | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | Sheet Type Roof (with AC/GI sheets) | १००० | ७०० | २८००० | १ | १९६.०० | म.फु.कृ.वि.राहुरी |
| | | १००० | ७०० | २८००० | २ | ३९२.०० | डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | Ventilated Flat Roof | १००० | ७०० | ३५००० | २ | ४९०.०० | म.फु.कृ.वि.राहुरी -१<br>डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला-१ |
| | **एकूण** | | | | **५** | **१०७८.००** | |

**३. Strengthening of Seed quality control components:-**

**३.१. बियाणे गुणवत्ता नियंत्रण व्यवस्थेची निर्मिती व बळकटीकरण:-**

**३.१.अ. बीज परीक्षण प्रयोगशाळांसाठी उपकरणे खरेदीसाठी अर्थसहाय्य-**

| अ.क्र. | प्रयोगशाळेचे नाव | रक्कम (लाखांमध्ये) |
|---|---|---|
| १. | बीज परीक्षण प्रयोगशाळा, पुणे. | ६२.९४ |
| २. | बीज परीक्षण प्रयोगशाळा, नागपूर | १९.२८ |
| ३. | बीज परीक्षण प्रयोगशाळा, परभणी | १४.५७ |
| | एकूण | ९६.७९ |

**३.१.ब. विद्यमान बीज परीक्षण प्रयोगशाळांचे बळकटीकरण (नूतनीकरण)-**

| अ.क्र. | प्रयोगशाळेचे नाव | रक्कम (लाखांमध्ये) |
|---|---|---|
| १. | बीज परीक्षण प्रयोगशाळा, नागपूर | २१.०० |
| २. | बीज परीक्षण प्रयोगशाळा, परभणी | ४.०० |
| | एकूण | २५.०० |

**३.२. पारंपरिक पद्धतीद्वारे आनुवंशिक शुद्धता तपासणीसाठी अर्थसहाय्य:**

**३.२.अ. Strengthening of Grow-Out Test Farm:-**

| S. No | Activity/Particulars | Amount (Rs.in lakh) |
|---|---|---|
| 1 | Essential civil works like sheds, stores, pump houses, workshop, road, fencing, electrification, drying platforms, threshing yards buildings etc. for the Centre as a whole. | 20.00 |
| 2 | Irrigation/drainage setup, pipelines, water tanks, slab channels etc. | 20.00 |
| 3 | Land development, levelling, mapping, topography adjustments, bounding, plot lay out, etc | 20.00 |
| 4 | Mould board plough, disc harrow, tillers, levellers, rigger, bund former and such other implements/farm machinery, essential tools for repair and maintenance with Tractor (35 HP) and Trolley etc. | 30.00 |
| 5 | Mobility for field visit- hiring of one jeep, one motorcycle and 2 bicycles | 10.00 |
| | **Total** | **100.00** |

४. **National Seed Reserve** (१००% केंद्र हिस्सा) –

४.१. **Maintenance Cost:–**

राखीव बियाण्यांच्या देखभालीचा पीकनिहाय लक्ष्यांक खालीलप्रमाणे आहे..

| अ.क्र. | पीक | राखीव बियाणे लक्ष्यांक (क्विं.) | राखीव बियाण्यांच्या देखभालीचा खर्च (रु.लाख) |
|---|---|---|---|
| अ | **खरीप हंगाम– पायाभूत बियाणे** | | |
| १ | सोयाबीन | ८० | ०.४१ |
| २ | भात | १०० | ०.५१ |
| ३ | उडीद | ५० | ०.२६ |
| ४ | तूर | ४० | ०.२० |
| ५ | मुग | ५० | ०.२६ |
| | **एकूण पायाभूत बियाणे (FS)** | **३२०** | **१.६३** |
| | **खरीप हंगाम– प्रमाणित बियाणे** | | |
| १ | सोयाबीन | २००० | १०.२० |
| २ | भात | २५०० | १२.७५ |
| ३ | उडीद | १००० | ५.१० |
| ४ | तूर | १५०० | ७.६५ |
| ५ | मुग | ७०० | ३.५७ |
| ६ | मका | १५० | ०.७७ |
| | **एकूण प्रमाणित बियाणे (CS)** | **७८५०** | **४०.०४** |
| | **एकूण खरीप हंगाम (CS+FS)** | **८१७०** | **४१.६७** |
| ब | **रब्बी हंगाम– पायाभूत बियाणे** | | |
| १ | ज्वारी | १०० | ०.५१ |
| २ | गहू | ३०० | १.५३ |
| ३ | हरभरा | ३०० | १.५३ |
| | **एकूण पायाभूत बियाणे (FS)** | **७००** | **३.५७** |
| | **रब्बी हंगाम– प्रमाणित बियाणे** | | |
| १ | ज्वारी | २५०० | १२.७५ |
| २ | हरभरा | ४००० | २०.४० |
| ३ | गहू | ३५०० | १७.८५ |
| | **एकूण प्रमाणित बियाणे (CS)** | **१००००** | **५१.००** |
| | **एकूण रब्बी हंगाम (CS+FS)** | **१०७००** | **५४.५७** |
| | **एकूण एकंदर** | **१८८७०** | **९६.२४** |

-----------------